Vol 6 Issue 11 Dec 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

# Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# पाठ्यक्रमात संगीताची आवश्यकता

डॉ. सौ. अर्चना माधव अंभोरे
सहयोगी प्राध्यापक, श्रीमती रा. दे. गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.

## प्रस्तावना :

शिक्षणाचा उद्देश केवळ बालकाला इतिहास, भूगोल, भाषा, गणित इ. शिक्षण विषयांचे देणे नसून त्याच्या सुप्त गुणांचा सर्वांगीण विकास करणे आहे.

जर्मन शास्त्रज्ञ 'पेस्टॉलॉजी' यांच्या मते-

''शिक्षण म्हणजे मनुष्याच्या उपजत, स्वाभाविक, समग्र प्रगतीशील विकास आहे.''[१]

### तर स्वामी विवेकानंदांच्या शब्दांत –

''मनुष्याच्या अंतर्निहित पूर्णत्वाला अभिव्यक्त करणे म्हणजेच शिक्षण होय.''

संगीत कलेद्वारे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा सहज विकास होतो. विद्यार्थ्यात काही बाबतीत जरी साम्य असले तरी त्यांच्यात थोडा तरी फरक हा असतो. कुणी विलक्षण बुध्दिमत्तेचा धनी तर कुणी मंदबुद्धि, कुणाची तेज स्मरणशक्ती तर कुणी कल्पना प्रधान, कुणी खेळात चांगले तर कुणी उत्तम चित्र काढणारा, संगीत काव्यादि मुलांचे आवडीचे विषय, हे त्यांना मिळाल्यावर ते अधिक प्रगति करतात.

काही विद्यार्थ्यांची मानसिक पातळी साधारण किंवा अगदी साधारणतम असते. त्यांची स्मरणशक्ती अतिशय कमजोर असते. काही वेळा एखाद्या विषयावर लक्ष केंद्रीत करु शकत नाही. अशा विद्यार्थ्यांवर केवळ संगीताद्वारेच उपचार करुन त्यांच्या उणीवा दुर करु शकतो. जवळपास सर्वच विद्यार्थ्यांना संगीताची आवड असते. 'गाना और रोना' सभी को आता है असे म्हटले गेले आहे.

'अभिनय आणि संगीत' ह्या मनुष्याच्या सहज प्रवृत्ति आहेत. 'जन्म' झाल्यावर तो रडतो हे जसं त्याला उपजतच येते, तसंच गाण देखील त्याची उपजत शक्ति आहे. 'संगीत' शब्दाची व्याख्याच मुळी 'संगीत रत्नाकर' ग्रंथात 'गीत, वाद्य व नृत्य' यांचा 'मेळ' अशी केली आहे. (गीत, वाद्य तथा नृत्तं त्रयं संगीत मुच्यते।) संगीत शब्दात 'सम' हा उपसर्ग 'गीत' ला लागतो. 'सम्'



म्हणजे सह बरोबर. कशाच्या बरोबरचे गीत? तर वाद्य व नृत्य यांच्या बरोबर चे गीत। संगीतात रागाचे स्वर, त्याचे चलन, आरोह-अवरोह, पकड, जाति, समय इ. पाठ करण्याची आवश्यकता असते. या व्यतिरिक्त राग - विस्तारासाठी रागाचे मुख्य स्वर-समुदाय, त्यांचे समप्रकृतिक रागांची साम्य, भेद इ. गीतांचे शब्द देखील आवश्यक आहेत. गाता, वाजवितांना गायक, वादक नवनविन कल्पना साकारित असतो आणि त्याच वेळी रागातील स्वरांना साकार रुप प्रदान करीत असतो.

भारतीय संगीताचे एक वैशिष्ट्य आहे की, गायकाची गायकी, कल्पना आणि त्याची अभिव्यक्ति यांत जितके नाविन्य, वैविध्य तेवढाच तो उच्च दर्जाचा समजला जातो. अशा प्रकारे हिंदुस्थानी संगीताद्वारे बालकाची स्मृति, कल्पना आणि रचनाशक्तिचा विकास होतो. म्हणूनच फ्रोबेल ने किंडर गार्टन प्रणालीत संगीताला अीयासक्रमाचे आवश्यक अंग मानले आहे. या प्रणालीत शिक्षिका गाते आणि गीता च्या भावानुकूल अंगाचे संचालन करते. मुलांमध्ये अनुकरण प्रवृत्ती अधिक असते. ते शिक्षिकेचे अनुकरण करतात. गातांना आनंद मिळवितात. अशा प्रकारे त्यांना- संगीतासोबतच भाषेचे ज्ञान देखील मिळते आणि ते व्यायाम देखील करतात.

दर्जेदार साहित्यकृती, काव्यकृति, संत-पंत काव्याची विद्यार्थ्यांना ओळख करुन त्यांच्या गळी उतरविण्याचे संगीतासारखे दुसरे साधन नाही.

संगीताद्वारे मुलांना नैतिकता, शिस्त देखल लावू शकतो. आज याची अत्यंत आवश्यकता आहे. अध्यापक आणि यांची ओरड असते की मुलांमध्ये नैतिकता आणि शिस्त मुळी नाही. समस्येचे निराकरण संगीताद्वारे होऊ शकते. केवळ नीतीमत्ता, शिस्तीचे व्याख्यानं न देता ज्यातून काही गाणी जर शिकविली तर त्यातून ते स्वयं शिक्षा घेऊ शकतील.

मानसशास्त्रज्ञांच्या मते बालकांमध्ये अशा कांही जन्मजात प्रवृत्ती असतात की त्याच्या वागणुकीसाठी प्रेरक, मार्गदर्शक ठरतात. ज्ञान किंवा अज्ञान, इच्छा किंवा अनिच्छे मुळे तो या प्रवृत्तीच्या आधारावर कार्य करतो. या सर्व प्रवृत्तींना मूळ प्रवृत्ति म्हटल्या गेले आहे. प्रसिध्द मानसशास्त्रज्ञ मॅकडूगलने मुख्य १४ मुख्य प्रवृत्तींचा स्वीकार केला आहे. जसे - पलायन, युयुत्सा, कामप्रवृत्ति, आत्मस्तुती, संग्रहवृत्ति, जिज्ञासा, रचनात्मक वृत्ति इ. यांत काम प्रवृत्तीला त्याने खूप महत्व दिले आहे. वासना हीच मनुष्याच्या वर्तनाचाआधार आहे. परंतु सभ्यतेच्या विकासासोबत त्यात परिवर्तन अपेक्षित आहे. दमन, विलियन, मार्गान्तरीकरण तसेच संशोधनाद्वारे हे कार्य संभव आहे. काम प्रवृत्तीत परिवर्तन आणण्यासाठी संगीताला मार्गान्तरीकरणाचे सर्वोत्तम साधन मानल्या गेलं आहे. किशोरावस्थेत विरोधी लिंगाच्या व्यक्तींप्रती जे आकर्षण निर्माण होते. त्याला पारस्पारिक सद्भावात बदलवू शकतो. पाश्विक प्रवृत्तींना परिष्कृत करुन साहचर्य, सहाय्य तसेच सद्भावनेत तृप्तीची अनुभूती दिल्या जाऊ शकते. संगीताद्वारे हे कार्य सहज होऊ शकते.

वैज्ञानिक प्रगती मुळे दोन देशांतील अंतर कमी झाले आहे. यापूर्वी आपल्या जवळील देशांनाच आपण शेजारी देश म्हणतो होतो. मात्र दूर-दूरचे देश देखील आपले शेजारी झाले आहे. यांच्याशी सांस्कृतिक संबंध प्रस्थापित केल्यावर आपसांत आणखी जवळीक निर्माण होते. आपल्या देशांतून अन्य देशांत अनेक वेळा सांस्कृतिक मंडळे पाठवल्या गेले आहेत आणि विदेशांतूनही भारतात आलेले आहेत. वसुधैव - कुटूम्बकम् ची भावना संगीताद्वारेच शक्य आहे.

मर्ढेकरांच्या शब्दांत कलेची व्याख्या १-माध्यमाच्या अनुषंगाने रुपाची रचना करणे म्हणजे कला होय. शुध्द व सात्विक भाव देणारी, आनंद देणारी, आत्मिक विकास साधणारी कला म्हणजे शुध्द कला! मर्ढेकरांनी तिला सद्‌कला असे म्हटले आहे. या सद्‌कलेची उपासना विद्यार्थ्यांद्वारे करवून घेतल्यास सद्‌भिरुची संपन्न, सुजाण, नागरिक बनवणे सहज शक्य आहे.

हिंदुस्थानी संगीताने आपल्या व्यावहारिक आणि उपयोगी स्वरुपाने आपल्या संस्कृतीला हजारो वर्षे टिकवून ठेवलं आहे.

भारतीय संगीताचा विकास ही थोड्या अवधीची गोष्ट नाही. संगीताचा जन्म मानवाच्या जन्मासोबतच झाला अर्थात सृष्टीच्या सुवर्णमयी प्रारंभापासून संगीताचा जन्म झाला व तिच्या अंतापर्यंत संगीत साथ संगत करीत राहिल!

संगीताच्या सुवर्णमय इतिहासाचा संबंध अनेक संगीत शैली, युग प्रवृत्ती व सृजनकर्त्यांचा एक क्रमिक व व्यापक सुवर्ण फलकच निर्माण झाला आहे. भारतीय संगीतात जे भक्तितत्त्व समाविष्ट आहे, ती देन युगानुयुगांच्या संत महंतांची, ऋषिमुनींची देण आहे.

ईश - उपासना प्रत्येक धर्माचे परम लक्ष्य आहे. धर्म कुठलाही असो, ईश्वराचे रुप

कुठलेही असो परंतु गुणगान, उपासना इ. व्दारे 'त्याला' प्राप्त करणे हे धर्माचे अंतिम उद्दिष्ट आहे. निर्मिती 'परमेश्वरापासूनच' (भगवद्‌गीतेत सामदेवाला, वेदानां सामवेदोऽस्मि! अध्याय १०, श्लोक २२, भगवदगीता) असे भगवान श्रीकृष्णाने संबोधले आहे. ब्रम्हदेवाने देखील -

*''सामवेदादिदं गीतम् संजग्राह पितामह।''*

(भरतनाट्य शास्त्र, अध्याय १)

असे म्हटले आहे.

बृहद नारदीय पुराणांत 'नाहं वसामि वैकुंठे। नाहं योगिनांच हृदये, मद्‌भक्ता यत्र गायन्ति, तत्र तिष्ठामि नारद। अर्थात जेथे समूह स्वरांत माझे गुणगान असेल तेथे मी असतो असं म्हटले आहे. संगीताच्या माध्यमातून ईश्वराचे गुणगान संभव आहे. जेव्हा श्रध्देने हृदय भारुन जाते तेव्हा हृदयोद्‌गारार्थ स्वरलहरी बाहेर पडतात. म्हणून तर भक्तिकाळात जेव्हा जनता तत्कालिन अत्याचारांनी त्रस्त झालेली होती त्या वेळी तिच्या समोर परमेश्वराला शरण जाण्याखेरीज पर्यायच नव्हता. हे संगीताव्दारेच शक्य झाले. म्हणूनच तुलसी, मीरा सूरदासादि भक्त कवी निर्माण झालेत.

अशा प्रकारे संगीताद्वारे स्मृती, कल्पनाशक्तिचा विकास, सृजनशीलता, नैतिकता, सुजाण नागरिकत्व राष्ट्रप्रेम इ. सद्‌गुणांचे बीजारोपण, मूळ प्रवृत्तींचे रुपांतर, हीन भावनेचे निष्कासन इ. संभव आहे. या व्यतिरिक्त संगीत शिक्षणाचे शैक्षणिक, सांस्कृतिक मानसिक, तसेच आध्यात्मिक महत्व म्हणूनच अभ्यासक्रमात संगीताचे अस्तित्व परम आवश्यक आहे.

डॉ. ॲनी बेझंट या युरोपीय महिलेने सर्वप्रथम भारतीय शाळांमध्ये पाठ्यक्रमांत संगीताचा समावेश केला. सन १९११ मध्ये रविंद्रनाथ टागोरांनी शांतिनिकेतनात, आणि महात्मा गांधींनी १९१५ मध्ये साबरमती आश्रमात संगीत शिक्षणाचा प्रारंभ केला.

उत्तर प्रदेश, तत्कालीन युनायटेड प्राविंसेज मध्ये सर्व प्रथम १९१६ मध्ये तत्कालीन कायस्थ पाठशाळा, अलाहाबाद मध्ये संगीताचे वर्ग सुरु झालेत आणि सन १९२५ मध्ये इतर शाळांमध्ये! आनंदाची बाब अशी की आज जवळपास शाळांमध्ये संगीताचा समावेश झाला आहे. मात्र अगदी सर्वच शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, शाळांमध्ये संगीत विषय आवश्यक व्हायला हवा आहे.

### निष्कर्ष :

१) मानवाच्या उपजत, स्वाभाविक, समग्र प्रगतीसाठी संगीत शिक्षण हे महत्त्वाचे आहे.
२) संगीताव्दारे स्मृतीविकास, कल्पना शक्तिचा विकास होतो.
३) सृजनशीलता, नैतिकता, सुजाण नागरिकत्त्व, राष्ट्रप्रेमादि सद्‌गुणांचे बीजारोपण संगीताव्दारे शक्य आहे.
४) मूळ प्रवृत्तींचे रुपांतर, हीन भावनांचे निष्कासन संगीताव्दारे शक्य आहे.
५) संगीत शिक्षणाचे शैक्षणिक, सांस्कृतिक, मानसिक, अध्यात्मिक महत्त्व म्हणूनच अभ्यासक्रमात संगीताचे अस्तित्व परम आवश्यक आहे.

### संदर्भ ग्रंथ :

१)रानडे, अशोक दा., (२००६) हिंदुस्थानी संगीत, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया.
२)अहमद, नज्मा परवीन, ( ) हिंदुस्थानी म्युझिक, ए स्टडी ऑफ इटस डेवलपमेंट इन १७, १८ सेंचुरीज, मनोहर पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.
३)प्रज्ञानंद स्वामी (१९६५), ए हिस्टॉरिकल स्टडी ऑफ इंडियन म्युझिक, आनंदधाम प्रकाशन, कलकत्ता.
४)......................, (१९७४) उत्तर भारतीय संगीत का संक्षिप्त इतिहास, संपा. लक्ष्मीनारायण गर्ग, अनुवाद. अरुण कुमार सेन. संगीत कार्यालय, हाथरस.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org